# APPEAL FOR APPLICATION FOR THE ACADEMIC YEAR 2018-2019, STUDENTS FROM SCHEDULE CASTE, TO GET SCHOLARSHIP- ONLINE APPLICATION.

With reference to the above subject hereby inform that for the academic year 2018-2019, to get scholarship to the students from schedule caste, has to apply online we have attached herewith the format for the same.

**महाराष्ट्र शासन**

# समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, 3 चर्चरोड, पुणे 411 001.

## सन 2018-19 या शैक्षणिक वर्षामध्ये अनुसूचित जातीच्या (SC) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी जाहीर आवाहन

बीटी हे या संकेतस्थळाचे नाव असून https://mahadbtmahait.gov.in हे संकेतस्थळ संचालक, माहिती व तंत्रज्ञान (DIT) यांचेमार्फत नव्याने कार्यान्वित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फी/ विदयावेतने / निर्वाह भत्ता वितरीत करावयाच्या खालील योजनांचा समावेश या संकेतस्थळामध्ये करण्यात आला आहे.

i. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती.

ii. राज्य शासनाची मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रतीपुर्ती योजना.

iii. राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती ( इ. 11 वी 12 वी ).

iv. व्यवसायीक अभ्यासक्रम मधुन शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना.

**सदर डीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यावर त्यांना देय होणारे शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता, शिक्षण फी, परिक्षा फी, इतर अनुज्ञेय फी, त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट वितरीत केला जाणार आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड क्र. आपल्या बँक खात्याशी संल्ग्नीत करुन घ्यावेत.**

### महाडीबीटी ची वैशिष्टये

1. लाभार्थी कोणत्याही वेळी कुठुनही महाडीबीटीच्या वेबसाईटवर नोंदणी करु शकतात.
2. लाभार्थी त्यांच्या स्वतःच्या अर्जाची स्थिती युझर आयडीने पाहू शकतात.
3. सुलभ पडताळणी आणि पारदर्शकता यासाठी मार्कशीटस, जात प्रमाणपत्र इ. अपलोड करु शकतात.
4. महाडीबीटी प्रकीयाच्या विविध स्तरांवर विद्यार्थी आणि संस्थांना एसएमएस आणि ई-मेल अलर्टची तरतूद.
5. विद्यार्थीच्या बँकेच्या खात्यात शिष्यवृत्तीचे प्रत्यक्ष वितरण.
6. सुलभ शिष्यवृत्ती मंजुरीची प्रक्रिया
7. भुमिका आधारित युनिक लॉग इन आयडी आणि पासवर्ड सर्वांसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
8. विभाग आणि राज्य प्राधिकरण यांच्याव्दारे शिष्यवृत्तीच्या देखरेखीची पारदर्शकता.
9. कोणत्याही स्वरुपाच्या तांत्रिक बाबींची अडचण उदभवल्यास संकेत स्थळावरील टोल फ्री क्रमांकावर साधण्यास कळविले आहे. (टोल फ्री क्रमांक 022-49150800)
10. पात्रतेचे निकष विभागाचे संकेत स्थळ https://sjsa.maharashtra.gov.in वर देखील उपलब्ध आहे.

### विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

1. वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज MAHADBT PORTAL ( संकेत स्थळ https://mahadbtmahait.gov.in) वर देण्यात आलेल्या युजर मॅन्युअल / एफ.ए. क्यु. चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टलवर दिलेल्या सुचनांचे पालन करुन अर्ज भरण्याचा विहित तारखे पर्यंत न थांबता संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावा.
2. अर्जदार शिष्यवृत्तीसाठी निर्धारीत केलेल्या सर्व अटी लागू करण्यासाठी आणि पुर्ण करण्यासाठी पात्र आहे, याची खात्री करण्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची असेल.
3. जर अर्जदाराची पात्रता कोणत्याही टप्प्यावर अवैध आढळली तर त्याची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.
४. अर्जदाराने अंतिमत: अर्ज जमा करण्यापुर्वी तपासावे. की त्याच्या/ तिच्या व्दारे प्रदान केलेले सर्व तपशील योग्य आहेत कारण त्यानंतर माहिती संपादित करण्यासाठी कोणतीही तरतूद प्रणालीमध्ये नसेल.
५. शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करण्याची पध्दत केवळ ऑनलाईनच असेल.
६. "*" चिन्हासह जे रकाने चिन्हांकित आहेत ते भरणे अनिवार्य असेल.
७. ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्र. मोबाईल क्रमांकाशी संल्ग्नीत नाहीत त्यांनी त्वरीत जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार क्रमांक मोबाईल क्रमांकाशी संल्ग्न करुन घ्यावेत.

**सर्व संस्थांच्या/ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सुचना देण्यात येते की, उपरोक्त योजनांची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सुचनाफलकावर कायमस्वरुपी लावावी व पात्र विद्यार्थ्यांना वरील योजनांचे अर्ज ऑनलाईन पदधतीने भरण्यासाठी सहकार्य करावे व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेले अर्जांची पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पदधतीने छाननी करावी.**

विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर ही लाभाची रक्कम जमा केल्याबाबतची सूचना डीबीटी पोर्टलव्दारे प्रत्येक महाविद्यालयाला दिली जाईल. त्यामुळे संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांनी कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेवू नये. तसेच कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही याची योग्य ती दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थांची असेल.

Assistant Commissioner, Social Welfare
Mumbai Suburban